
दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990
लातूर वर्ष ४ थे अंक १०३ वा बुधवार दि.२५ सप्टेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# गटबाजी खपवून घेणार नाही

नागपूर : 'पार्टी विथ अ डिफरन्स' अशी प्रतिमा असलेल्या भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नागपुरात येऊन पक्षातील गटबाजीवरून पदाधिका-यांचे कान टोचले. राजकारणात काम करत असताना अनेकदा मतभेद होत असतात. तर विविध कारणांमुळे अनेकांना उमेदवारी मिळत नाही. त्यातून गटबाजी निर्माण होते. मात्र निवडणूक काळात पक्षात अशी गटबाजी खपवून घेणार नाही. सर्वांनी अंतर्गत मतभेद बाजुला सारून एकत्रित निवडणूकीचे काम केले पाहिजे, असे प्रतिपादन अमित शाह यांनी केले. विशेष म्हणजे उपस्थित हजारो पदाधिका-यांकडून त्यांनी ही बाब वदवून घेतली. नागपुरात विदर्भातील ६२ विधानसभांच्या प्रमुख पदाधिका-यांच्या कार्यकर्ता बैठकीदरम्यान ते बोलत होते. कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पक्षाचे राज्य प्रभारी भूपेंद्र यादव, राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिव प्रकाश, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, निवडणूक संचालन समितीचे अध्यक्ष रावसाहेब दानवे, मध्यप्रदेशचे मंत्री कैलास विजयवर्गीय, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, माजी केंद्रीय राज्यमंत्री हंसराज अहीर, रणधीर सावरकर प्रामुख्याने उपस्थित होते. एका तिकीटासाठी अनेक दावेदार असतात. मात्र सर्वेक्षण, जातीय समीकरणे इत्यादी बाबी पाहून उमेदवारी निश्चित करावी लागते. जर तिकीट मिळाले नाही तर त्यावरून कुणीही असंतुष्ट होऊन त्यावर गोंधळ घालत आहे असे प्रकार विदर्भात दिसायला नको, असे परखड मत अमित शाह यांनी व्यक्त केले. सर्वांनी कटुता दूर सारून महायुतीसाठी मैदानात उतरले पाहिजे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचा धनुष्यबाण व अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे चिन्ह असलेल्या घड्याळीच्या उमेदवारांचा कमळाप्रमाणेच पूर्ण ताकदीने प्रचार झाला पाहिजे, असे अमित शाह यांनी स्पष्ट केले. विदर्भात महायुतीला ४५ जागा हव्यात भाजपचे महाराष्ट्रातील नेते विदर्भात महायुतीला ४० ते ४२ जागा मिळाव्यात यासाठी प्रयत्न करत आहेत. मात्र जर



महाराष्ट्रात सत्ता हवी असेल तर विदर्भात कमीत कमी ४५ जागांवर विजय आवश्यक आहे. त्यामुळे त्या दृष्टीने नियोजन करायला हवे, असे निर्देश अमित अमित शाह यांनी दिले. महाविकास आघाडीला कमकुवत करा यावेळी अमित शहा यांनी भाजपच्या प्रत्येक पदाधिका-याने बुथपातळीवर जाऊन काम करण्याचे आवाहन केले. महाविकास आघाडीतील शिवसेना, राष्ट्रवादी व काँग्रेसचे बुथपातळीवरील कार्यकर्ते भाजपमध्ये आणण्यासाठी प्रयत्न करा.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर तालुक्यातील सिरसी, पाखरसांगवीतील स्वराज्य नगर येथील

### विकासकामांची केली पाहणी नागरीकांच्या समस्या ऐकून घेतल्या

सिरसीच्या सरपंच कौशल्या रघुनाथ कांबळे यांचे पती श्रीहरी रामा कांबळे यांना नुकताच हृदयविकाराचा झटका आला होता. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन श्रीहरी कांबळे यांच्या प्रकृतीची आस्थेवाईकपणे चौकशी करून त्यांना तब्येतीची काळजी घेण्यास सांगितले.



लातूर / प्रतिनिधी :- राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मंगळवार दि. २४ सप्टेंबर रोजी सकाळी लातूर तालुक्यातील सिरसी येथील रस्ता, नाली आदी विकासकामांची पाहणी केली, तसेच नागरिकांच्या अडीअडचणी, शेतरस्त्याच्या समस्या समजून घेऊन त्यांच्याशी विकास कामासंदर्भात चर्चा केली. यानंतर लातूर शहरानजिकच्या पाखरसांगवीतील स्वराज्य नगर येथील स्थानिक नागरिकांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या, उपस्थित प्रशासकीय अधिकारी यांना या समस्या तातडीने सोडविण्यासाठी त्यांनी सूचना केल्या. यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, लातूर पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी किरण कोळपे, विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, लातूर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या उपअभियंता उषा मोतीपोवळे, माजी जिल्हा परिषद सदस्य सहदेव मस्के, ग्रामपंचायत अधिकारी बालाजी माडीबोयने, गुणवंत कांबळे, हनमंत काळे, महादेव गोजमगुंडे, जगन्नाथ देशमुख, परमेश्वर जाधव, सुभाष गोपे, धर्मराज देशमुख, भरत जाधव, पप्पू कदम, त्रंबक हाळे, भरत भंडे उपस्थित होते. तर स्वराज्य नगर येथे महावितरणचे कनिष्ठ अभियंता रामलिंग उटगे पाखरसांगवीचे ग्रामसेवक विठ्ठल चोथवे मंडळ अधिकारी खंदाडे, अनुरथ चांगमारे अच्युत पांचाळ,मारुती लहाने,सचिन वैद्य,राजाभाऊ नवगिरे,अनिल ताकतोरे,प्रकाश सोनवणे,मिनाबाई विधाते, रुक्मिणी चव्हाण, मारुती लहाने आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी ग्रामस्थ उपस्थित होत

## राज्यातील विविध तीर्थक्षेत्र विकासांच्या ३०५ कोटी रुपयांच्या आराखड्यांना मंजुरी

मुंबई : राज्यातील विविध तीर्थक्षेत्र विकासाच्या सुमारे ३०५ कोटी ६३ लाख रुपयांच्या आराखड्यांना आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यात श्री क्षेत्र पंढरपूर येथील दर्शन मंडप व दर्शन रांग या सुविधेसाठी १२९ कोटी ४९ लाख रुपयांच्या कामांचाही समावेश आहे. अर्थसंकल्पात तसेच वेळावेळी आश्वासित केल्याप्रमाणे आपण राज्यातील तीर्थस्थळांच्या विकासासाठी आपण भरीव निधी उपलब्ध करून देत आहे. त्याप्रमाणे या तीर्थस्थळ व पर्यटनस्थळांच्या विकासासाठी तातडीने नियोजन करण्यात यावे. यासर्वच ठिकाणची कामे दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण व्हावीत याची काळजी घ्यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या बैठकीत दिले. भगूर (जि. नाशिक) येथील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनावर आधारित थीमपार्क साकारण्यात येणार आहे. त्यासाठीच्या चाळीस कोटी रुपयांच्या प्रस्तावास तसेच पहिल्या टप्प्यातील १५ कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली. अमळनेर (जि. जळगाव) येथील देशातील एकमेद्वितीय अशा मंगळग्रह देवस्थानाच्या २५ कोटींच्या विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली. सातारा जिल्ह्यातील कोयना जलाशय-मौजे मुनावळे येथील जलक्रीडा पर्यटन सुविधा (ता. जावळी, जि. सातारा)साठी ४७ कोटी रुपयांच्या अतिरिक्त मागणीस मान्यता



देण्यात आली. हे सर्व प्रस्ताव पर्यटन विभागाने सादर केले. त्याबाबत सविस्तर सादरीकरण व त्यातील प्रकल्प आणि सुविधांची माहिती सादर केले.

ग्रामविकास विभागाने सादर केलेल्या अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर येथील संत गाडगेबाबा यांची कर्मभूमी ऋणमोचन येथील १८ कोटींच्या विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली. तसेच श्री क्षेत्र गहिनीनाथगड (जि. बीड) च्या विकास आराखड्यातील २ कोटी ६७ लाखांच्या कामांस मान्यता देण्यात आली. याशिवाय मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात अजमल कसाब या सशस्त्र दहशतवाद्यास जीवंत पकडणा-या शहीद तुकाराम ओंबळे यांच्या सातारा जिल्ह्यातील केंडबे (ता. जावळी) येथील मुळगांवी स्मारक उभारण्यासाठी १५ कोटी रुपयांच्या निधीच्या तरतुदीसाठी बैठकीत मान्यता देण्यात आली. याचबरोबर, नगर विकास विभागाने नागपूर शहरातील आराखडे सादर केले. त्यातील लक्ष्मीनारायण शिवमंदिर-नंदनवनच्या २४ कोटी ७३ लाखांच्या विकास आराखड्यास, कुत्तेवालेबाबा मंदिर आश्रम-शांतीनगरसाठी १३ कोटी ३५ लाख रुपये आणि मुरलीधर मंदिर पारडी विकास आराखड्यासाठी १४ कोटी ३९ लाख रुपयांच्या तरतूदीस मान्यता देण्यात आली.






## माझी शक्ती, माझ कुटुंब म्हणजे आपले बुथप्रमुख : क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे

### उदगीर मतदार संघाची समतेचे आणि माणुसकीचे प्रतिक म्हणून ओळख

उदगीर/ प्रतिनिधी :- कोरोना महामारीच्या काळात आपण सर्वजण संयमाने काम केले. २०१९ च्या निवडणुकीत आपण सर्वांनी माझ्यावर विश्वास ठेवुन मला मोठ्या मताधिक्याने निवडून दिले. आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळेच मी आमदार ते राज्याचा कॅबिनेट मंत्री झालो आणि मागील ५ वर्षाच्या काळात मी उदगीर मतदार संघात विकासाचा डोंगर उभा केला आता आपले उदगीर जळकोट हे विकासाचे मॉडेल म्हणून महाराष्ट्रात नावारूपाला येत आहे. हे केवळ आपल्यामुळेच शक्य झाले. माझी शक्ती, माझ कुटुंब आपण सर्वजण असल्याची भावना क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केली.



ते उदगीर - जळकोट विधानसभा मतदार संघातील सरपंच, उपसरपंच, ग्राम पंचायत सदस्य, बुथ प्रमुख व प्रमुख पदाधिका-यांच्या संवाद बैठकीत बोलत होते. यावेळी सिद्धेश्वर पाटील, रामराव राठोड, समीर शेख, प्रवीण भोळे, अर्जुन आगलावे, श्याम डावळे, ब्रम्हाजी केंद्रे, बालाजी भोसले, सय्यद जानीमियाँ, संग्राम हासुळे पाटील, वसंत पाटील, शशिकांत बनसोडे, तात्या पाटील, पाशा शेख, फैजुखाँ पठाण, बाळासाहेब मरलापल्ले, दिपाली औटे, मधुमती कनशेट्टे, काजल मिरजगावे, सुनिल केंद्रे, सत्यवान पाटील, अभिजित औटे, शफी हाशमी, प्रदीप जोंधळे, गिरीश उप्परबावडे, नवनाथ गायकवाड, संगम टाले, धनाजी मुळे, नजीर हाशमी, इम्तियाज शेख, पाशा बेग, शुभम भुमणे, खाजा तांबोळी, प्रभाकर पाटील, दत्ता बामणे, दत्ता पाटील, अरविंद गिलचे, ॲड.वर्षा कांबळे, वैशाली कांबळे, प्रिती कवितकर, आझम पटेल, अझहर मोमीन, इब्राहिम नाना पटेल, ज्ञानेश्वर बिरादार, अविनाश गायकवाड, आदी उपस्थित होते .

पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, आपण केलेली लोकहिताची व सामजिक कामे, नागरिकांना उपलब्ध करुन दिलेल्या सर्व सुख सुविधा आदी संदर्भातील कामे शेवटच्या माणसापर्यंत पोहचवा आणि आपल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठीमागे मोठी ताकद निर्माण करा कारण आपल्या गावातला व वार्डातलाच बुथ कार्यकर्ता व बुथ प्रमुखच ही आपली खरी ताकद असुन बूथ प्रमुख व प्रमुख पदाधिका-यांनी आता जोमाने कामाला लागावे असे आवाहन ना.संजय बनसोडे यांनी केले. येत्या ३० सप्टेंबर रोजी जनसन्मान यात्रा व मतदार संघातील विविध विकास कामांचा लोकार्पण सोहळा राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या हस्ते होणार असुन या कार्यक्रमास आपण सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहनही ना.बनसोडे यांनी केले. यावेळी मतदार संघातील बुथ प्रमुख, पदाधिकारी व पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय....

# श्रीलंकेतील बदल

भारताचा एक महत्त्वाचा शेजारी असलेल्या श्रीलंकेच्या राष्ट्रपतिपदी डाव्या विचारसरणीच्या अनुरा कुमारा दिसनायके यांची नियुक्ती झाल्यामुळे उपखंडातील राजकारणावर त्याचा निश्चितच परिणाम होणार आहे. ज्याप्रकारे दिसनायके यांच्या पक्षाने श्रीलंकेतील आतापर्यंतच्या पारंपरिक पक्षांना बाजूला सारून डाव्या विचारसरणीच्या आपल्या पक्षाला राष्ट्रपतिपदावर बसवले आहे ते पाहता श्रीलंकेतील जनतेलाही अशा प्रकारचा बदल हवा आहे हे दिसून येते. या सर्व घडामोडी घडत असताना भारतासाठी त्या किती महत्त्वाच्या आहेत याचाही विचार करावा लागणार आहे. नवनिर्वाचित अध्यक्ष दिसनायके ज्या पक्षाचे प्रतिनिधित्व करतात तो जनता विमुक्त पेरामुना हा राजकीय पक्ष दीर्घकाळापासून डाव्या विचारसरणीकडे झुकलेला आहे. अर्थात, गेल्या चार-पाच वर्षांच्या कालावधीमध्ये दिसनायके यांच्याकडे या पक्षाचे नेतृत्व गेल्यावर त्यांनी काही प्रमाणात लिबरल होण्यास प्रारंभ केला आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेवर लक्ष ठेवून त्यात सुधारणा करण्याकडे त्यांनी प्राधान्य दिले असले, तरी देशातील अर्थतज्ज्ञांना मात्र देशाची प्रगती आणि डाव्या विचारसरणीच्या नेत्याच्या हातात सत्ता हा विरोधाभास असल्याचे वाटत आहे, हेसुद्धा या ठिकाणी महत्त्वाचे आहे.श्रीलंकेमध्ये २०२२ मध्ये ज्या प्रकारे जनतेने उठाव करून तत्कालीन राष्ट्रपती गोटाबाया राजपक्षे यांना देशाबाहेर हाकलून दिले होते त्यानंतर देशातील परिस्थितीमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झाला होता. देशातील तरुणांना आणि इतरांनासुद्धा आता देशामध्ये बदल हवा अशी जाणीव झाली होती. त्याचेच प्रतिबिंब या अध्यक्षपदाच्या निवडणुकीमध्ये उमटले आहे. कारण, या निवडणुकीमध्ये विजयी अध्यक्ष दिसनायके यांनी विद्यमान राष्ट्राध्यक्ष रानील विक्रमसिंगे यांचा पराभव केलाच. शिवाय गोटाबाया यांच्या पक्षातील नानल राजपक्षे यांचासुद्धा या निवडणुकीमध्ये पराभव केला. म्हणजेच गेली अनेक वर्षे श्रीलंकेतील राजकारण ज्या दोन गटांमध्ये घुटमळत होते त्यातून या राजकारणाला बाहेर काढून श्रीलंकेतील नागरिकांनी एक तिसरा पर्याय निवडल्याचे दिसते. हा डाव्या विचारसरणीचा पर्याय लोकशाहीमध्ये परिणामकारक ठरू शकतो आणि कदाचित श्रीलंकेलासुद्धा फायदेशीर ठरू शकतो.गेल्या काही वर्षांमध्ये दिसनायके यांनी आपली डावी विचारसरणी काही प्रमाणात मवाळ केली आहे. पण मुळात त्यांचे धोरण चीनधार्जिणे असल्याचेही मानले जाते. त्यामुळे भारतासाठीसुद्धा श्रीलंकेतील हा बदल महत्त्वाचा मानावा लागणार आहे. भारताचे जे प्रमुख शेजारी देश आहेत त्यापैकी बांगलादेश, पाकिस्तान आणि आता श्रीलंका या सर्व देशांमध्ये जर चीनचे वर्चस्व वाढू लागले, तर त्याचा भविष्यात भारताला तोटा होणार आहे हे उघड आहे. अर्थात, सध्याच्या परिस्थितीमध्ये श्रीलंकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष थेटपणे चीनची बाजू घेतील अशी शक्यता नाही. कारण २०२२ मध्ये जेव्हा श्रीलंकेला मोठ्या प्रमाणात आर्थिक मदतीची गरज होती तेव्हा भारतानेच ती मदत केली होती आणि श्रीलंकेची अर्थव्यवस्था सावरली होती. याची जाणीव त्यांनाही आहे आणि त्याबाबत भारताचे आभारही मानले आहेत. पण श्रीलंकेच्या अंतर्गत बाबीमध्ये भारतासह कुठल्याही देशाने लक्ष घालू नये हा मात्र त्यांचा आग्रह असणार आहे. ज्या प्रकारे श्रीलंकेतील तामिळी चळवळीला भारताचा पाठिंबा असल्याचे आरोप आतापर्यंत केले जात होते ते पाहता आणि नवनिर्वाचित अध्यक्षांची तामिळी चळवळीबाबत असलेली कठोर भूमिका पाहता हा एक विषय मात्र भारत आणि श्रीलंका यांच्यातील वादाचा मुद्दा भविष्यात बनू शकतो. तामिळींनी स्वतंत्र राष्ट्राची मागणी करून देशामध्ये संघर्ष करू नये अशा प्रकारची भूमिका दिसनायके यांच्या पक्षाने पूर्वीपासून घेतली असल्याने आणि श्रीलंकेतील तामिळी चळवळीला भारताने पाठिंबा देऊ नये असे स्पष्टपणे बजावले असल्याने हाच एक विषय महत्त्वाचा ठरणार आहे. अर्थात, गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये श्रीलंकेच्या राजकारणामध्ये पोकळी निर्माण झाली होती ती भरून काढण्याचे काम दिसनायके यांनी केले असले तरी त्यांच्यासमोर अशी अनेक आव्हाने आहेत म्हणूनच भारत आणि चीन यांच्याशी संबंध जपताना त्यांना योग्य समतोल साधावा लागणार आहे. सांस्कृतिकदृष्ट्या आणि व्यावहारिकदृष्ट्या सुद्धा श्रीलंकेला चीनपेक्षा भारताची मैत्री जास्त फायदेशीर ठरणार आहे याची कबुली श्रीलंकेतील यापूर्वीच्या राज्यकर्त्यांनी आणि श्रीलंकेतील तज्ज्ञांनीही दिली आहे. ही निवडणूक होण्यापूर्वी दिसनायके भारताच्या दौर्‍यावर आले होते आणि त्यांनी प्रमुख नेत्यांशी चर्चा केली होती. साहजिकच केवळ मार्क्सवादी विचारसरणीशी बांधिलकी आहे म्हणून ते लगेच भारताशी मैत्री झटकतील आणि चीनचा हात पकडतील असेही नाही. अध्यक्षपद हे एक मोठे आव्हान आहे याची कल्पना त्यांना आहे त्यामुळे एका रात्रीत सर्व बदल त्यांनाही अपेक्षित नाहीत.सध्या तरी श्रीलंकेतील सत्तेत बदल झाला आहे हे जास्त महत्त्वाचे आहे. या बदलाचे परिणाम त्या देशामध्ये काय होतात आणि शेजारी असलेल्या भारतासारख्या देशावर काय होतात हेच पाहणे आगामी कालावधीमध्ये औत्सुक्याचे ठरणार आहे.

# उठे समाज के लिये उठे उठेजगे स्वराष्ट्र के लिए जगे जगे स्वयं सजेवसुंधरा संवार दे!

उठे समाज के लिये उठे उठे
जगे स्वराष्ट्र के लिए जगे जगे
स्वयं सजेवसुंधरा संवार दे!

राष्ट्रीय सेवा योजनेचे हे लक्ष्यगीत व्यक्ती जीवन समृद्ध करता-करता समाज आणि राष्ट्राप्रति आपली असणारी जबाबदारीची जाणीव करून देणारे आहे.गेल्या ५४-५५ वर्षांपासून देशातल्या विविध विद्यापीठांमधून आणि संलग्नित महाविद्यालयांतून समाजसेवेची एक प्रयोगशाळा, संस्कारशाळा म्हणून एक नवा आदर्श या योजनेने राष्ट्रासमोर उभा केला आहे.राष्ट्रप्रेम, समाजसेवा, श्रमप्रतिष्ठा, मूल्यसंस्कार, जीवनानुभूती देऊन दक्ष नागरिक घडविण्याची अविरत प्रक्रिया या माध्यमातून होत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात देशातील तरुणांनी विशेषतः महाविद्यालयीन आणि विद्यापीठिय युवकांनी देशातील लोकांच्या सेवेसाठी काही रचनात्मक कार्य केले पाहिजे, अशीयामागचीधारणाआहे. भारत हा खेड्यांचा देश असल्याकारणाने खेड्यातील जनतेला स्वातंत्र्याची सर्व फळे उपभोक्ता यावीत. याकरिता राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू, स्वामीविवेकानंद यांच्यायुवकांसाठीच्याप्रेरणाआणिस्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, मानवता, धर्मनिरपेक्षता या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या संवैधानिक मूल्यांची जोपासना यासंकल्पनेतील ही योजना ४० लाखांच्या जवळपास विद्यार्थी-विद्यार्थीनीया योजनेत सक्रियपणे सहभागी असून तेवढ्याच तत्परतेने, उत्साहानेसमाजसेवा आणि राष्ट्रसेवा करण्यात मग्न आहेत.

रा. से. यो. उद्दिष्ट्ये, हेतू:

महाविद्यालयीन अध्ययन, अध्यापन, संशोधन करत असतानाच लोकसेवेचे राष्ट्रसेवेचे रचनात्मक कार्य करून स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याच्या उद्देशाने ही योजना सुरू झाली. समाजज्ञान, समाजभान, समाजजान, सामाजिक बांधिलकी, शिक्षणाचे व्यावहारिक उपयोजन, नेतृत्व गुण, लोकशाही प्रवृत्तीत वाढ, राष्ट्रीय एकात्मता निर्मिती, सामाजिक विषमता दूर करणे, सेवाभाव, संवेदना जागृती, स्वावलंबन, आत्मनिर्भरता, स्त्री-पुरुष समानता या व यासारख्या मूल्यांची रुजवणूक करणे ही उद्दिष्ट्ये देखील या योजनेमागे आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक रा. सेयो. चिन्हावर आधारित बिल्ला आपल्या छातीवर लावतात, ते देखील प्रतिकात्मक आहे. हे चिन्ह कोणार्क येथील सूर्य मंदिराच्या रथाच्या चाकावर आधारित असून चक्र हे गतीचे प्रतीक आहे.बिल्ल्यातील लाल रंग तरुणांच्या उसळत्या रक्ताचे प्रतीक असून त्यातून उत्साह, जोश प्रतीत होतो. तर नीळा रंग अथांग आकाशाचे प्रतिनिधित्व करतो.२४ आरे राष्ट्रासाठी अष्टोप्रहर - २४ तास तत्पर राहण्याची शिकवण देतात.

व्यक्तिमत्त्वविकास:

रा. से. योजना स्वयंसेवकांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणारे एक सशक्त आणि राष्ट्रव्यापी माध्यम आहे.येथे विधायक आणि कल्पक अशा नेतृत्वातून कर्तृत्वाच्या नव्या वाटा सापडतात. व्यक्तिमत्त्व विकास म्हणजे शरीर, मन आणि हृदय (आत्मा) यांचा समतोल विकास होय. सामर्थ्य, सौंदर्य आणि संपन्नता यातून त्याचे दर्शन घडते. विद्यार्थ्याचे बाह्यांग ज्यात स्वच्छता,टापटीपपणा, सुयोग्य हालचाली, देहबोली, वर्तन, व्यवहार अभिप्रेत असतात. अंतरिक विकास म्हणजे सदगुणांचा समुच्चय असतो. सहकार्य भावना, समर्पण, मनाचा मोठेपणा, संवेदनशीलता, क्षमाशीलता, आत्मविश्वास, नेतृत्वगुण, सभाधीटपणा, वक्तशीरपणा, निर्णय क्षमता, कार्यतत्परता, सकारात्मकता, आशावाद, दूरदृष्टी, मनोविकास, वक्तशीरपणा या व यासारख्या अनेक गोष्टी विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमांमधून, बौद्धिक व्याख्याने, प्रबोधनात्मक कार्यक्रम, शिबिरे, चर्चासत्रे, कार्यशाळा यातून आपोआप शिकत असतो.

युवाशक्ती ही अणुशक्ती सारखीच प्रचंड शक्ती आहे. बाबा आमटे म्हणतात त्याप्रमाणे,'सृजनशील साहसांना कोणत्याही सीमा नसतात. कोणत्याही देशातील तरुण त्या देशाचा शिल्पकार असतो. तरुण असाध्य ते साध्य करू शकतो. युवाशक्तीचे व्यवस्थित जडणघडण केले, सुसंस्कारित, चारित्र्यसंपन्न विद्यार्थी घडवले तरच महान राष्ट्र घडू शकते. त्यामुळे रा. से. यो. नियमित कार्यक्रम आणि विशेष युवक शिबिरामधून विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्त्वाचा सर्वांगीण विकास घडविला जातो.

समाजसेवा:

व्यक्तिविकास साधता-साधता राष्ट्रीय सेवा योजनेतून समाज सेवाही केली जाते. सानेगुरुजी म्हणतात त्याप्रमाणे-

खरा तो एकची धर्म खजगाला प्रेम अर्पावेखख
जगी ते हीन अतिपतित खजगी जे दीन पद दलितख
तया जाऊन उठवावे खजगाला प्रेम अर्पावेखख

जगभरातले सर्वच धर्म, संप्रदाय, विचारधारा परस्परांवर प्रेम करण्यास सांगतात. आपल्या संवेदना जागृत करून सहवेदनेची जाणीव निर्माण करण्यासाठी मानवतेची शिकवण राष्ट्रीय सेवा योजनेतून दिली जाते. आपण ज्या समाजात राहतो त्याचे आपणावर काहीतरी ऋण आहे व त्याची आपण पूर्तता केली पाहिजे. याकरिता युवकांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. उघड्या डोळ्यांनी समाज पाहण्याची समाजातील प्रश्न, समस्या, आव्हाने पाहण्याची संधी युवकांना मिळते. या संस्कारकेंद्रातून 'समाजसेवेचे प्रयोग' नेहमी चालत असतात. या योजनेत अनेक जातींचे, धर्मांचे,पंथाचे, भाषेचे युवक सामुदायिकपणे काम करतात. त्यांच्यात सहकार्याची भावना निर्माण होते. धर्म, जाती, वर्ण, प्रांतभेद, भाषाभेद, वंश, परंपरा यासारखे भेद मावळून स्त्री-पुरुष समानता इथे गुण्यागोविंदाने नांदते. एड्स जाणीव जागृती, अंधश्रद्धा निर्मूलन, स्त्रीभ्रूणहत्या, महिला सबलीकरण, दुष्काळ निवारण, साक्षरता, वृक्ष लागवडव संवर्धन, बालविवाह, मतदार जनजागृती,पडीक जमीन विकास, आपत्कालीन व्यवस्थापन, रक्तदान, अवयदान, नेत्रदान, नैसर्गिक आपत्तीचे व्यवस्थापन, व्यसनमुक्ती, लोकसंख्या शिक्षण, शेतकरी आत्महत्या, कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक शोषण, वैज्ञानिक दृष्टिकोन, उद्योजकता या व अशा अनेक सामाजिक प्रश्न, आव्हानांवर चर्चा, गटचर्चा, संवाद, सर्वेक्षण अभ्यास, संशोधन रा. से. योजनेच्या माध्यमातून होत असते.

राष्ट्र विकासातील योगदान:

राष्ट्रीयत्वाची भावना अंगीकारून युवकांनी राष्ट्रसेवा करावी असा राष्ट्रीय सेवा योजनेचा हेतू आहे. सद्य:परिस्थितीत राष्ट्रसमोर जी आव्हाने आहेत. ते पेलण्याचे सामर्थ्य युवकांततयार व्हावे. सामर्थ्यशाली

बलसागर भारत होवो ख
विश्वात शोभूनी राहो खखयाकरिता सर्वतोपरी प्रयत्न



चालू आहेत. अनिष्ट चाली, रीती, रूढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा यावर आपण काही प्रमाणात मात केली आहे. पण आज भ्रष्टाचार शिष्टाचार बनू पाहत आहे. वाढती लोकसंख्या, दारिद्र्य, बेरोजगारी,चंगळवाद, व्यसनाधीनता, वासनांध पिढी, आदर्श नेतृत्वाचाअभाव व नक्षलवाद, दहशतवाद, शोषण, वाढते तापमान या व यासारख्या आव्हानांना सामोरे जाऊन आवाज उठविणारे व अन्यायाशी तडजोड न करता चार हात करणारे युवक रा. से. योजनेत घडले पाहिजेत.

रा. से. योजनेनेअनेकवेळा आपले राष्ट्रप्रेम आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे.

१. केरळमधीलकटट्यामहे गाव १००% साक्षर.
२. कर्नाटकात साडेतीनशे एकरात साडेतीन लाख वृक्ष लागवड.
३. मध्य प्रदेशात १४,००० हेक्टर बरड जमिनीचा विकास.
४. आंध्र,बिहार,पश्चिम बंगाल, आसाम राज्यात पूरग्रस्तांना मदत.
५. उत्तरकाशीतील भूकंपग्रस्तांना मदत.
६. मराठवाड्यातील किल्लारी भूकंपग्रस्तांना मदत.
७. कोरोना प्रादुर्भाव काळातयुद्धपातळीवर (कोरोना योद्धा) म्हणूनमदत.
८. पाणलोट क्षेत्र विकास.

अलीकडच्याकाळातशेतकरीआत्महत्या, कौटुंबिक हिंसाचार, हर घर तिरंगा, मेरी माटी, मेरा देश, मतदार जनजागृती, पोलिओ निर्मूलन, बेरोजगारांचे सर्वेक्षण, युवा पोर्टल नोंदणी, बालविवाह जागृती, रस्ते सुरक्षा अभियान, सायबर साक्षरता (डिझिटल साक्षरता), पोलीस मित्र यासारखे उपक्रम व्यापक अशा राष्ट्रीय मूल्यांवर राष्ट्रीय सेवा योजना कसे कार्य करते याचे द्योतक आहे.

थांबला ना सूर्य कधी, थांबलीनधारा
अन् धुंद वादळास, कोठलाकिनारा.. - बाबा आमटे

अनंतध्येयासक्ती उराशी बाळगून स्वतःला सावरता-सावरता राष्ट्र उभारणीचे उत्तुंग असे कार्य करीत आहे.

एकसुदृढयुवक, समृद्ध अशा नवभारताची निर्मिती करण्यास तयार आहे. आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पाहता-पाहता विकसित राष्ट्र म्हणूनही भारत देश लवकरच ओळखला जाईल. केवळ घोषणांनी राष्ट्रनिर्मिती होत नाही. त्याकरिता -

हाथ लगे निर्माण में,नहीं मांगने,नहीं  मारनेख

नवनिर्मितीचा हा ध्यास, ग्राम-शहर विकासात भरीव योगदान देईल.

हमसबमिलकरदेशका, अपनेजगमेंनाम जगायेंगे ख
एन.एस.एस. का परछम लेकर, आगे बढते जायेंगे खख

कारण राष्ट्रीय सेवा योजनेचा जन्मच या ब्रीदवाक्यातून झाला आहे. एकदा राष्ट्रीय सेवा योजनेचा वसा आणि वारसा स्वीकारला की कायम रा.से. योजनामय बनूनजातोतोच खरा स्वयंसेवक, कार्यक्रमाधिकारी, कार्यक्रम समन्वयक असतो.

या सर्व कामात-

इतनी शक्ती हमे देना दाता, मन का विश्वास कमजोर हो नाख
हम चले नेक रस्ते से हमसे, भूलकर भी कोई भूल होनाखख

भारतीयस्वातंत्र्याच्या या अमृतमहोत्सवी काळातदेशाचीविकसितराष्ट्रांत गणनाव्हावी. आचंद्र-सूर्य, तारेदेशाचेस्वातंत्र्यअबाधितराहो.हीच प्रार्थना, सदिच्छा, शुभेच्छा !

संदर्भ ग्रंथ सूची:


१. स्वयंसेवककार्यनोंदवही, स्वा.रा. ती. म. वि., नांदेड.
२. प्रा. हेमंत गोखले, व्यक्तिमत्त्व विकासाचे सोपे मार्ग, विद्याभारती प्रकाशन, लातूर, जून २००७.
३. संपा. डॉ. एन. ए. मोटे, रा. से.यो. द्विवार्षिकांक१९९५-९७,स्वा. रा. ती. म. वि.नांदेड, मे १९९७.
४. संपा.डॉ. नागोराव कुंभार, डॉ. श्रीकांत गायकवाड,उच्चशिक्षण: व्यक्तिमत्त्व विकास व मानवी मूल्ये, अरुणा प्रकाशन, लातूर, ऑगस्ट २०११.
५. शिव खेरा, जगापण सन्मानानं, मॅकमिलन इंडिया लिमिटेड, दिल्ली २००३.
६. मंगेश कोळी, यशोमंदिर, कवितासागर प्रकाशन, शिरोळ (कोल्हापूर), सप्टेंबर २०१५.
७. मैनुअल (संशोधित) राष्ट्रीय सेवा योजना, युवा कार्यक्रम और खेल मंत्रालय, नवी दिल्ली,२००६.


*************


मराठीविभागप्रमुखतथा
रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी,
महात्माबसवेश्वर महाविद्यालय, लातूर.
भ्रमणध्वनी: ९४०५३१५३५६


# जागतिक औषधनिर्माता (फार्मासिस्ट) दिन




प्रिय मित्रांनो, दरवर्षी प्रमाणे २५ सप्टेंबर हा जागतिक औषधनिर्माता दिन म्हणून साजरा केला जातो. जागतिक औषधनिर्माता दिनानिमित अलोपॅथिक, आयुर्वेदिक व औषधी वनस्पती औषधाचे महत्व व नवीन औषधाची माहिती यासह औषधनिर्माताचे कार्य याविषयी जनजागृती केली जाते. २०२४ या वर्षासाठीचे घोषवाक्य जागतिक स्वास्थ आवश्यकतेची पूर्तता करतो तो फार्मासिस्ट  हे आहे. सन १७५२ साली अमेरिकेमधील पेनसिल्वानिया हॉस्पिटल मध्ये जॉनथन रॉबटस यांची प्रथमता औषधनिर्माता म्हणून नेमणूक करण्यात आली. भारतामध्ये १९ व्या शतकामध्ये औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमाची सुरवात झाली. सन १९३२ मध्ये प्रा.महादेविलाल श्राफ यांनी बी.एसी. फार्मसी हा अभ्यासक्रम बनारस हिंदू युनिव्हर्सिटी इथे सुरु केला. तसे, खरे पाहीलेतर औषधनिर्माता म्हणजे औषधनिर्माण करणे, व त्यांची गुणवत्ता तपासणे, गुणवत्तेची खात्री करणे, संशोधन करून नवीन औषधनिर्माण करणे व ते डॉक्टरने निदान केलेल्या रोगावर योग्य ते औषध देणे तसेच औषधाचे साठवण व औषधाची विभागणी करणे व रुग्णालयामध्ये किंवा मेडीकल वर आलेल्या रुग्णाचे हसतमुख स्वागत करतो व त्यांची विचारपूस करून त्यांच्याकडील असलेले प्रिस्क्रीपशन पाहून औषध वितरण करतो व औषधाबद्दल सर्व माहिती समजावून सागतो हे मुख्य कार्य हे औषधनिर्मात्याचे आहे. कोविड-१९ या महामारीच्या संकटात डॉक्टर सोबत खाद्याला खादा लावून २४ तास कसलीही सुट्टी न घेता त्यांनी योगदान दिले. एवढेच नाही जे मध्ये काम करणारे सर्व औषधंनिर्माता, केमिस्ट, यांनी या महामरीच्या संकटामध्ये काम केले व या रोगांवर स्वदेशी लस निर्माण करुन जगाला त्यांच्या कार्याबद्दल दाखऊन दिले. अश्या सर्व कठीण परिस्थितीमध्ये जेव्हा जेव्हा यांना काही सामाजिक उपक्रमासाठी आवाहन करण्यात येते तेव्हा लक्षणीय संख्येने पुढे येतात ही कौतुकस्पद बाब आहे. जेनेरिक औषधांबद्दल असलेले गैरसमज रुग्णांना समजावून सांगण्याचे काम व रूग्ण समुपदेशनाची व्याख्या रूग्णांना किंवा त्यांच्या प्रतिनिधींना तोंडी किंवा लिखित स्वरूपात औषधोपचाराची माहिती, वापराच्या सूचना, साइड इफेक्ट्स, खबरदारी, स्टोरेज, आहार आणि जीवनशैलीतील बदलांबद्दल सल्ला देणे. तसेच, औषधाचा दुरुपयोग ही भारतात एक गंभीर समस्या आहे आणि तिचा कुठल्याही सामाजिक-आर्थिक स्थराच्यालोकांवर परिणाम होऊ शकतो. बहुतांश वेळा, किंचित ही जाणीव न होता, तरुणपिढी प्रिस्क्रिप्शन किंवा नॉन-प्रिस्क्रिप्शन ड्रग्स किंवा अवैध पदार्थांच्या गैरवापराकडे आकर्षित होतात. औषधाच्या दुरुपयोगाची लक्षणे शारीरिक, वर्तनात्मक आणि जैविक म्हणून वर्गीकृत केली जातात. औषधाचा गैरवापर यामुळे या पासून होणाऱ्या दुष्परिणाम याबद्दल माहिती सांगितली जाते व औषधाचा दुरुपयोग कमी करण्याचे सातत्याने प्रयत्न औषधनिर्मात्याकडून केले जाते.



जेव्हा औषधाबदल व रोगाबद्दल जनजागृती साठी कुठल्याही आर्थिक मोबदल्याची अपेक्षा न बाळगता सामाजिक बांधिलकीतून हे कार्य आनंदाने व निष्ठेने करत आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने मोफत रक्तदान, तंबाखू, गुटखा व्यसनमुक्ती, आरोग्य शिबीर, व सारख्या रोगाची जनजागृती हे शिबिराच्या माध्यमातून लोकपर्यंत व रुग्णांपर्यंत पोचविण्याचे व सेवा देण्याचे काम सातत्याने करत असतो.त्यासोबतचजागतिक स्वास्थ व आरोग्य चांगले राहील याबद्दलमाहिती व संदेश लोकांपर्यंत पोहचवण्याचे कार्य करतात. औषध हे अमृत आहे. जोपर्यत सृष्टीवर जीवन आहे, तोपर्यंत औषधाची गरज सर्वांना पडणार आहे. अनेक आव्हाने समोर असली तरीसुद्धा औषध व्यवसाय अक्षय आहे. म्हणूनच दरवर्षी २५ सप्टेंबर हा जागतिक औषधनिर्माता दिवस म्हणून साजरा केला जातो. जागतिक स्वास्थ आवश्यकतेची पूर्तता करतो तो फार्मासिस्ट सर्व फार्मासिस्ट बांधवानामानाचा सलाम व जागतिक औषधनिर्माता दिनाच्या खुप खुप शुभेच्छा..!!

***************


डॉ.एम.जी.होगाडे,
प्राचार्य,
माईर पुणे,  महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासुटीकल सायन्सेस, लातूर - ४१३५३१
मो.नं. ८३०८६४७७७०

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा निष्ठावंत नेता - बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे

बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांना बाबासाहेब आंबेडकरांचा उजवा हात म्हटले जात असे. ते खऱ्या अर्थाने बाबासाहेबांचे राजकीय, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक वारसदार होते. राजाभाऊ खोब्रागडे खंबीरपणे बाबासाहेबांच्या विचारांच्या सोबत असायचे. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर चळवळ व राजकारणाच्या सर्व क्षेत्रात बॅरिस्टर साहेबांचे योगदान लक्षणीय होते ! श्रीमंत घराण्यात जन्म घेऊनही बहिस्कृत अस्पृश्य वर्गाच्या हितासाठी व कल्याणासाठी त्यांनी स्वतःचे सर्व आयुष्य अर्पित केले.

बाबासाहेब आंबेडकरांनी व्हाइसरॉय कौन्सिलमध्ये अस्पृश्य विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी एक योजना मांडली होती. या संदर्भात चंद्रपूरचे धनाढय देवाजीबापू आणि इंदिराबाई या आंबेडकरी बाण्याच्या पोटी भाऊराव (राजाभाऊ) यांचा २५ सप्टेंबर १९२५ रोजी जन्म झाला. देवाजीबापू हे १९४५ ला राजाभाऊ यांना घेऊन बाबासाहेबांना भेटले. त्यांना बाबासाहेब म्हणाले, मी परदेशी शिष्यवृत्तीने १५ विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी पाठवित आहे. तुमची आर्थिक परिस्थिती चांगली आहे, त्यामुळे तुम्ही स्वतःच्या खर्चाने स्वतःच्या मुलाला (राजाभाऊला) परदेशी पाठविले, तर मी त्याऐवजी एक गरीब मुलाला आणखी पाठवू शकतो. बाबासाहेबांचे हे म्हणणे देवाजीबापू यांनी मान्य केले. त्यानंतर देवाजीबापूंनी स्वखर्चाने राजाभाऊ यांना बॅरिस्टर ही पदवी घेण्यासाठी लंडनला पाठविले.

राजाभाऊंच्या घरचे वातावरण हे राजघराण्यासारखे होते व राजाभाऊ हे नावाप्रमाणेच राजा होते. ते अत्यंत दयाळू, उदार दानी, कर्तव्यदक्ष व न्यायी होते. बॅरि. राजाभाऊंनी चंद्रपुरच्या जिल्हा व सत्र न्यायालयात वकिलीचा व्यवसाय सुरु केला. बाबासाहेब आंबेडकरांशी झालेल्या भेटीत देवाजीबापूंनी राजाभाऊला समाजाच्या सेवेसाठी अर्पण करावे अशी इच्छा बाबासाहेबांनी व्यक्त केली. त्यामुळे बाबासाहेबांचा हा आदेश स्वीकारून राजाभाऊंना समाजसेवेकरिता देवाजीबापूंनी समर्पित केले व राजाभाऊंनी दलितांच्या उत्थानासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वप्रणाली नुसार स्वतःला वाहून घेतले.

बॅरि. राजाभाऊ यांच्या संघटन चातुर्य, दलितनिष्ठा, कर्तृत्व व चळवळीप्रती इमानदारी याची ओळख बाबासाहेबांना झाली. बाबासाहेबांनी बॅरिस्टर मधील नेतृत्व क्षमता ओळखली. डॉ. बाबासाहेबांनी १९५५ मध्ये बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांना अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या 'महासचिव' पदी नियुक्ती केली. नवीन उमेदीच्या तरुणांना नेतृत्व देणे व पुढे करणे ही काळाची गरज आहे, हे त्यावेळी बाबासाहेबांनी हेरले होते. १ जानेवारी १९५७ ला अहमदनगर येथे बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या संघटनेच्या पदाधिकारी यांची बैठक झाली. यात सर्वानुमते बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या संस्थांवर नियंत्रण ठेवण्यासाठी व राजकीय रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्यासाठी 'प्रेसिडियम' स्थापन करण्यात आले, याचे अध्यक्ष म्हणून राजाभाऊ खोब्रागडे यांची निवड करण्यात आली.

१९५७ च्या निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समिती व शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन यांनी एकत्रित निवडणूक लढवली. राजाभाऊ खोब्रागडे व दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली प्रचाराचा झंझावात निर्माण झाला. निकालानंतर शे.का. फे. ला भरघोस यश मिळाले. यानंतर झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत फेडरेशनचे १७ आमदार निवडून आले. पंजाब मधून ५, कर्नाटक मधून २, आंध्रमधून १, गुजरात मधून २ व मद्रास मधून २ असे एकूण २९ आमदार निवडून आले. हे सर्व यश बॅरि. राजाभाऊ अध्यक्ष असतांना घडून आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेली शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन या पक्षाची संघटना, त्याकाळी भारतातील इतर कोणत्याही पक्षाच्या संघटनेपेक्षा अधिक सरस, अधिक सकस, अधिक सक्षम व समर्थ होती. या पक्षाचे अनुयायी, इतर कोणत्याही पक्षाच्या अनुयायांपेक्षा अधिक निष्ठावान व अधिक त्यागशील होते. बॅरिस्टर यांच्या अध्यक्षतेखाली सर्वानुमते निर्णय घेऊन ३ ऑक्टोबर १९५७ ला नागपूरमध्ये ७ लक्ष लोकांच्या उपस्थितीत 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' ची स्थापना करण्यात आली. एन. शिवराज यांना आर.पी.आय. चे प्रथम अध्यक्ष करण्यात आले होते.

बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे हे १९५८ ते १९६४, १९६६ ते १९७२ व १९७८ ते १९८४ या कालावधीत राज्यसभेचे सदस्य होते. यात डिसेंबर १९६९ ते १९७२ मध्ये बॅरिस्टर हे राज्यसभेचे उपसभापती पण होते. रिपाई ला राज्यसभेत उपसभापती चा बहुमान मिळाला. बौद्धांच्या सवलती, मागासवर्गीयांना बढतीत राखीव जागा, लक्ष्मी बँक प्रकरण, काश्मिरचे विलीनीकरण, अन्नधान्य धोरण, निवडणूक योजना, भाषावार प्रांतरचना, जमीनधारणा कमाल मर्यादा, पंचवार्षिक योजना, शिक्षणासाठी आर्थिक तरतूद, अनुसूचित जाती-जमाती अहवाल, राष्ट्रीय एकात्मता इत्यादी विषयावर बॅरि. राजाभाऊ यांनी संशोधनात्मक अभ्यासपूर्ण आणि वकृत्वशैलीयुक्त अशी भाषणे राज्यसभेत देऊन आपल्या वैचारिकतेचा परिचय घडविलेला होता. आंबेडकरी तत्वप्रणालीनुसार करण्यात आलेली तर्कनिष्ठ, कालसंगत आणि कल्याणकारी असे विश्लेषण आहे. अशा अनेक शिष्टमंडळाचे नेतृत्व त्यांनी केले.

माजी पंतप्रधान अटलबिहारी बाजपेयीसारखे मातब्बर पुढारी त्यांच्या नेतृत्वात सदस्य होते. लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांतील उपसभापती पद विरोधी पक्षाला द्यायची प्रथा आता रूढ झालेली आहे. राज्यसभेत ही प्रथा बॅरिस्टरांच्या निवडीपासून सुरू झाली. त्याकाळी सर्वश्री. भूपेश गुप्ता, राजनारायण, नानासाहेब गोरे, निरेन घोष, चॅटर्जी यासारखे रथी-महारथी सदस्य होते. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि व्ही.व्ही. गिरी यांच्यानंतर बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांनीच राज्यसभा कुशलतेनी हाताळली असं जाणकाराचं मत आहे. अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या वतीने १९५९ आणि १९६३ ला भूमिहिनांचा सत्याग्रह झाला. या सत्याग्रहाचा इतिहासात तोड नाही, याचे नेतृत्व हे दादासाहेब गायकवाड व बॅरि. खोब्रागडे यांनी केले होते. १९६४ च्या भूमिहीन सत्याग्रहाला केवळ रिपब्लिकन चळवळीत महत्वाचे स्थान आहे. तर या सत्याग्रहाचा जागतिक स्तरावर ऐतिहासिक महत्व आहे. या मोर्चाचे नेतृत्व हे दादासाहेब गायकवाड, बुद्धप्रिय मौर्य व बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांनी केले होते. या आर.पी.आय. पुरस्कृत सत्याग्रहाने भारत सरकारची झोप उडाली होती. या सत्याग्रहामुळे सरकारने एकूण ३७,५०० लोकांना एकूण २,५०,००० एकर जमीन वाटल्या गेली. बॅरि. राजाभाऊंनी कामगार चळवळी चालवल्या, कोतवाल संघटन, बिडी मजदूर युनियन, डेमॉक्रॅटिक इंडियन ट्रेड युनियन (डीटू) या संघटना राजाभाऊंनी उभ्या केल्या आणि त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेले संघटनात्मक वैचारिक मूल्य व प्रतिष्ठा दिली. १४ ऑक्टोबर १९५६ ला नागपुरात बौद्धधम्म दीक्षा कार्यक्रम झाला त्यावेळी बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे हे अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचेचे सरचिटणीस होते. बाबासाहेबांचा जीवाला धोका होऊ नये व सुरक्षितेच्या दृष्टीने कार्यकर्त्यांचे एक गुप्तचर समूह नागपुरात टेहळणीसाठी नियुक्त केले. त्यानंतर देवाजीबापू खोब्रागडे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय बौद्ध जनसमिती ने चंद्रपूर मध्ये अल्प अवधीत १६ ऑक्टोबर १९५६ ला बौद्धधर्म दीक्षा कार्यक्रम बाबासाहेब आंबेडकरांच्या हस्ते संपन्न केला. चंद्रपुरात ३ लक्ष अस्पृश्यांना बौद्धधम्म दीक्षा देण्यात आली. यातील खर्चाचा सिंहाचा वाटा हा खोब्रागडे परिवाराचा होता. १९६६ साली कृष्णवर्णीय नेत्यांच्या परिषदेला भारताचे प्रतिनिधी म्हणून इंदिरा गांधींनी आवर्जून राजाभाऊंना अमेरिकेला पाठवले होते. तिथे त्यांनी दलित आणि निग्रोंच्या प्रश्नाचा उहापोह तर केलाच पण जागतिक स्तरावर सर्व वंचितांनी एकत्र येण्याची आवश्यकता स्पष्ट केली. भूमिहीनांच्या आंदोलनासाठी ते आग्रही होते. शेतीचे राष्ट्रीयीकरण व्हावे, असे त्यांचे मत होते. खाणकामगार आणि विडी कामगारांच्या युनियनचे ते अध्यक्ष होते. त्यांनी मुंबई आणि दिल्लीत मोर्चे काढून त्यांच्यासाठी अनेक अधिकार मिळवले. नवबौद्धांना सवलती मिळाव्यात यासाठीचे त्यांचे आंदोलनही यशस्वी झाले. नवबौद्ध विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती देण्यासाठी राज्य सरकारला त्यांनी भाग पाडले. हुंडाबळीचा कायदा व्हावा यासाठी त्यांनी संसदेत खूप प्रयत्न केले.

विदर्भ संयुक्त महाराष्ट्रात यावा यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न महाराष्ट्र कधीच विसरू शकणार नाही. संसदेतही त्यांनी महाराष्ट्राची बाजू जोरदार उचलून धरली. पुढे महाराष्ट्रात विदर्भावर होणाऱ्या अन्यायाने ते खूप व्यथित झाले. सत्तरच्या दशकात त्यांनी स्वतंत्र विदर्भाची आणि छोट्या राज्यांची भूमिका मांडायला सुरुवात केली. राजाभाऊंचे अष्टपैलू व्यक्तिमत्वही तसेच करारी अन् दृढनिश्चयी होते. 'कॉंग्रेसचे तुम्ही केवळ चार आण्याचे सदस्य झालात तरी तुम्हाला फार मोठे मोठे मंत्रीपद लाभेल' अशा प्रलोभनाची अनेकदा बरसात कॉंगेस श्रेष्ठीकडुन होऊनही त्याला त्यांच्या स्वत्वपूरित स्वार्थीनिवेशाने कधीच भीक घातली नाही व स्वाभिमानाने तळपणारी त्यांची अस्मिताही कधी कुणाकडे गहाण राहिलेली नाही, यालाच आत्मसन्मान म्हणतात. राज्यसभेचे उपसभापती झाल्यानंतर प्रथमत: त्यांचे चंद्रपूरला आगमन झाले असतांना त्यांच्या एका जिवलग मित्राने अभिनंदन करतांना म्हटले, 'बॅरिस्टर साहेब, आपले तर जीवनच बदलून गेले आहे'. यावर राजभाऊ उत्तरले, 'अहो, कसला आलाय बदल? यापूर्वीही मी महिन्याचे पंचवीस दिवस बाहेर घालवायचो, आजही घालवितो. फरक एवढाच की आधी मी आगगाडीने प्रवास करायचो तर आता विमानाने करतो' सहज बोलता-बोलता अगदी अल्पशा शब्दात राजाभाऊ अनाहूतपणे फार मोठया अर्थाचा अविष्कार करुन गेले. या इवल्याशा शब्दातून व्यक्त झालेल्या आशयापेक्षा त्यातील अव्यक्त आशय कितीतरी महानकिती तरी गहन राज्यसभेचे उपाध्यक्ष असले काय किंवा नसले काय, समता, स्वातँय आणि बंधुत्वाच्या शिलालेखातून उगम पावलेली त्यांची जीवनसरीता अभंग आणि अखंड वाहिली आहे. भगवान बुध्द, संत कबीर, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक प्रबोधनाच्या वैचारिक परंपरेचे कर्णधार म्हणून बॅरि. खोब्रागडे भारताच्या इतिहासाच्या धवल पृष्ठांवर चिरंजीवी ठरले. १९८१ मध्ये खासदार राजभाऊ यांनी राज्यसभेत बौद्धांचे धार्मिक स्थळ श्रावस्ती, कुशीनारा, बौद्धगया व नालंदा यांच्या विकासाचा आराखडा सरकारने तयार केला यासंदर्भात प्रश्न विचारला, नंतर सरकारने यावर कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या इमानदार रिपब्लिकन सेनापतीचे मृत्यू होण्यापूर्वी त्यांनी भारतात अस्पृश्य दलित, जमाती, अदिवासी, मागासवर्गीय, अल्पसंख्याक या वर्गाच्या हितासाठी जे शैक्षणिक, आर्थिक, नौकरीविषयक, शेती व भूमिहीनांना जमीन यासंदर्भात होते. याकरिता सतत राज्यसभेत खासदार म्हणून पाठपुरावा केला. दलितांना व बौद्धांना सतत न्याय मिळावा याकरिता सतत कार्य केले. बौद्धांची लोकसंख्या वाढावी व भारत बौद्धमय व्हावा हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न पूर्तीसाठी सतत बौद्धधम्म दीक्षेचे कार्यक्रम भारतभर करित राहिले. डॉ. बाबासाहेबांच्या निष्ठावान नेत्याचे दिल्लीत हृदयविकारामुळे परिनिर्वाण झाले. अशा महान व्यक्तिमत्त्वाच्या सन्मानार्थ, भारत सरकारने ११ नोव्हेंबर २००९ रोजी एक टपाल तिकीट जारी केले. रिपब्लिकन पक्षाच्या अशा थोर महापुरुषाला त्यांच्या ९९ व्या जन्मदिनानिमित्त विनम्र अभिवादन !

*************

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# मैद्याचा वापर न करता पारंपारिक पद्धतीने बनवा सांगली साताऱ्याची प्रसिद्ध लाटीवडी, स्नॅक्ससाठी उत्तम पर्याय

महाराष्ट्राची खाद्यसंस्कृती फार पसरलेली आहे. राज्याच्या वेगवगेळ्या भागात जाताच खाद्यपदार्थांमध्ये बदल जाणवू लागतो. महाराष्ट्रीयन खाद्यसंस्कृती आपल्या पारंपारिक पदार्थांसाठी विशेष ओळखली जाते. असाच एक महाराष्ट्राचा फेमस आणि लोकप्रिय पदार्थ आहे जो फार कुणाला ठाऊक नाही. या पदार्थाचे नाव आहे लाटीवडी. हा पदार्थ विशेषतः सांगली साताऱ्यात अधिक प्रसिद्ध आहे.

हा पदार्थ चवीला कुरकुरीत आणि टेस्टी लागतो. लहान मुलांना तर हा पदार्थ फारच आवडेल. स्नॅक्ससाठी हा एक उत्तम पर्याय आहे. आज आम्ही तुमच्यासोबत पारंपारिक पद्धतीने बनवल्या जाणाऱ्या लाटीवडीची एक खास रेसिपी शेअर करत आहोत. तुम्हाला पारंपारिक आणि कोणती नवीन रेसिपी ट्राय करायची असल्यास तुम्ही या पदार्थाचा विचार करू शकता. जाणून घ्या यासाठी लागणारे साहित्य आणि कृती. साहित्य लाटी वडी एक वाटी गव्हाचे पीठ एक वाटी बेसन पीठ अर्धा ते पाव चमचा हळद एक चमचा चिली फ्लेक्स चवीनुसार मीठ दोन चमचे मोहन तेल खसखस तळण्यासाटी तेल कृती लाटी वडी बनवण्यासाठी सर्वप्रथम एका परातीत गव्हाचे आणि बेसनाचे पीठ घ्या नंतर त्यात अर्धा ते पाव चमचा हळद एक चमचा चिली फ्लेक्स टाका, चवीनुसार मीठ टाकून मिश्रण एकत्र करा

यानंतर यात दोन चमचे तेलाचे मोहन टाका आणि थोडे थोडे पाणी टाकून याचे व्यवस्थित पीठ मळून घ्या आता गॅसवर कढई गरम करून त्यात पाव वाटी तीळ आणि कारळे टाकून खरपूस भाजून घ्या आणि थंड होण्यासाठी मग बाजूला ठेवून द्या थंड झाल्यावर मिक्सरमध्ये याला वाटून घ्या आता त्यात अर्धी वाटी सुक्या खोबर्याचा किस टाका आणि पुन्हा वाटून घ्या नंतर यात अर्धी वाटी शेंगदाण्याचा कुट टाका मग यात अर्धा चमचा हळद, एक चमचा लाल तिखट, अर्धा चमचा जिरे पावडर, अर्धा चमचा आले लसूण पेस्ट, चवीनुसार मीठ टाकून सर्व मिश्रण एकत्र करून घ्या आता वडीच्या पातीसाठी पीठ पुन्हा एकदा मळून घ्या आणि



त्याचा एक गोळा तयार करा हा गोळा व्यवस्थित पातळ आणि गोल लाटून घ्या हलकी खसखस टाकून याला हलक्या हाताने फिरावा खसखस टाकलेली पाती पलटून दुसऱ्या बाजूने हलक्या हाताने लाटा, मग यावर तयार सारण सर्वत्र पसरवून घ्यावे आणि हलक्या हाताने दाब द्या आता एका बाजूने पाती गुंडाळून घ्यावे आणि गुंडाळताना हलक्या हाताने दाबा आणि मग त्याते काप करून घ्या यानंतर गॅसवर एका भांड्यात पाणी तापवायला ठेवा आणि त्यावर चाळण ठेवा चाळणीला तेल लावून त्यात लाटी वडी वाफवण्यासाठी ठेवा. मध्यम आचेवर झाकण ठेवून ५ मिनिटे वाफ घ्या, चांगली वाफ आली की लाटी वडी काढून घ्या आता गॅसवर कढई ठेवून त्यात तेल टाका आणि तेल गरम झाले की सोनेरी रंग येईपर्यंत ही लाटी वडी छान तळून घ्या

अशाप्रकारे तुमची कुरकुरीत आणि चवदार लाटी वडी तयार होईल

# युरिक ॲसिडमध्ये खाऊ नका हा सफेद पदार्थ, सांधेदुखीने व्हाल हैराण

युरिक ॲसिड ही शरीरातील एक प्रकारची घाण आहे. अन्नामध्ये असलेल्या प्युरीन नावाच्या प्रथिनाच्या विघटनाने युरिक ॲसिड तयार होते. हे युरिक ॲसिड रक्ताद्वारे मूत्रपिंडात पोहोचते आणि लघवीद्वारे शरीरातून बाहेर टाकले जाते. परंतु जेव्हा युरिक ॲसिडचे प्रमाण शरीरात जास्त होते तेव्हा त्याचे क्रिस्टल्समध्ये रूपांतर होते आणि सांध्यातील संधिवातसारख्या समस्या निर्माण होतात.महिलांच्या शरीरात १.५ ते ६.० प्रति डेसीलिटर युरिक ॲसिड आणि पुरुषांच्या शरीरात २.५ ते ७.० इतके प्रमाण असणे हे अत्यंत सामान्य आहे. मात्र शरीरातील युरिक ॲसिडचे हे प्रमाण ओलांडले तर लगेच आहारात बदल करणे आवश्यक आहे असा सल्ला डॉक्टर देतात. डॉक्टर माधव भागवत यांच्या म्हणण्याप्रमाणे तुम्हाला युरिक ॲसिडचा अधिक त्रास असेल तर दही खाणे टाळायला हवे. आता नक्की कसे ते जाणून घ्या युरिक ॲसिड लक्षणे सांधेदुखी किंवा सूज येणे पाय सतत दुखणे पायांचे तळवे लाल होणे स्पर्श केल्यावर सांधे दुखणे सतत तुम्हाला लघवी होणे त्वचेचा रंग बदललेला दिसणे काय सांगते आयुर्वेद आयुर्वेदात युरिक ॲसिड असल्यास दही खाण्यास मनाई करण्यात आली आहे. वास्तविक, दह्यामध्ये प्रोटीनचे प्रमाण जास्त असते, जे युरिक ॲसिड शरीरात वाढवण्यास कारणीभूत ठरते. परंतु अनेक आरोग्यतज्ज्ञ दुग्धजन्य पदार्थांना युरिक ॲसिड कमी करण्यास सांगतात. विशेषतः आयुर्वेदिक डॉक्टर दही न खाण्याचा सल्ला देतात. त्यामुळे युरिक ॲसिडचा त्रास असेल तर दही न खाणे योग्य ठरते असे आयुर्वेदिक डॉक्टरांचे मत आहे. युरिक ॲसिड या पदार्थांनीही वाढते तुम्हाला जर युरिक ॲसिडचा त्रास असेल तर त्यामध्ये लाल मांस, अल्कोहोल, लोणी, मलई, आइस्क्रीम, कोल्डड्रिंक्स, अरवी, पालक, चणे, राजमा, तांदूळ, गूळ, मशरूम यांसारख्या पदार्थांचे सेवन हे अधिक भर घालू शकते. त्यामुळे अशा पदार्थांचा वापर आपल्या डाएटमध्ये कमी करा. त्यापेक्षा फ्लॉवरसारख्या भाज्यांचा समावेश करून घ्या. युरिक ॲसिडवरील त्वरीत उपाय गुळवेलाचा रस नियमित पिण्याने युरिक ॲसिड नियंत्रणात राहते. यातील अँटीइन्फ्लेमेटरी गुण त्रासातून सुटका मिळवून देतात तुळशीच्या पानांमध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि अँटीइन्फ्लेमेटरी गुण असल्याने तुम्ही नियमित सकाळी उपाशीपोटी ४-५ तुळस पाने खावीत अँटीसेप्टिक गुण असणाऱ्या हळदीचा वापर करावा. रोज रात्री झोपण्यापूर्वी दुधातून हळद मिक्स करून प्यावी. यामुळे युरिक ॲसिड नियंत्रणात राहण्यास मदत मिळते रोज सकाळी रिकाम्या पोटी कोमट पाण्यात एक चमचा त्रिफळा चूर्ण मिक्स करून पिण्यानेही युरिक ॲसिडवर त्वरीत परिणाम दिसून येतो कडुलिंबाच्या सालाचा वा पानांचा काढादेखील यावर उत्तम उपाय ठरतो

# आद: भदंत ज्योतिरत्न महाथेरो यांना पत्रकारांच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली..!







आद. भदंत ज्योतिरत्न महाथेरो यांच्या अंत्ययात्रेत देश विदेशातील शेकडो भंते यांनी उपस्थित राहून मंगलमैत्री आणि मंगल कामना केली. याप्रसंगी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ठाणे लोकसभा खासदार, व तसेच भारत सरकार कॅबिनेट मंत्री यांनी उपस्थित राहून भावपूर्ण आदरांजली वाहीली या आंत्ययात्रेत हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता पण एक ही नामचीन वर्तमान पत्रानी याची दखल घेतली नाही. किंवा इलेक्ट्रिक मिडीयाने दाखवले सुद्धा नाही हिच तर फार मोठी आपल्या देशाची शोकांतिका आहे, लोकशाई चा चौथा स्तंभ म्हणून वर्तमान पत्राकडे पाहीले जाते पण येथे जातीचा चष्मा वरचढ झाला आहे. जातीच्या चष्म्यातून बघणे सोडा आणि माणसातला माणूस जोडा..! हीच तर तथागत भगवंत गौतम बुद्धांची शिकवण आहे.

के. एच. हनवते

नवी मुंबई / के. एच. हनवते :- नालंदा सामाजिक शैक्षणिक, विपश्यना केंद्राचे संस्थापक अध्यक्ष, अखिल भारतीय भिख्खू संघाचे अजिव सदस्य : भदन्त ज्योतिरत्न महाथेरो यांच्या निर्वाणिक सुख:शांती करिता नालंदा विपश्यना केंद्र सेक्टर -६ ऐरोली नवी मुंबई येथे गेल्या ६ सप्टेंबर २०२४ रोजी दुःखद निधन झाले त्यांची बॉडी सलग पंधरादिवस नालंदा बुद्ध विहार ऐरोली येथे दर्शनासाठी ठेवली होती शेवटी त्यांची आंतीम यात्रा दिनांक : २२/०९/२०२४ रोजी निघाली आणि सेक्टर ९ ऐरोली येथील स्मशानभूमीत अग्निसंस्कार करण्यात आले. त्यावेळी आंखो देखा हाल (साप्ताहिक लोकदाता) संपादक : दिलीप काकनाटे (दैनिक महावृत्त) सहसंपादक : कल्याणराव एच. हनवते, (गर्जना महाराष्ट्राची आवाज वंचिताचा) : विशाल टोणगे, (दैनिक आक्षर राज): जे.के. पोळ (लोक अधार) राजु कांबळे यां पत्रकारांनी कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून भावपूर्ण आदरांजली वाहीली. बाकी वर्तमान पत्र हे केवळ जातीच्या चष्म्यातून पहातात की काय..?

# सोशल मीडिया वापरता ; हॅकर्स पासून सावधान !

किनवट/ शेख शौकत :- व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम व इतर सोशल मीडिया माध्यम वापरणे हे आता स्मार्टफोन धारकासाठी सामान्य गोष्ट झाली असून कोणत्याही गोष्टीच्या चांगल्या वाईट दोन बाजू असतात. आपल्या निष्काळजीपणाचा फायदा घेऊन आता मोबाईल हॅक होण्याचे प्रमाण वाढले आहे. सोशल मीडियाचा वापर करणे आनंददायी आणि उपयुक्त असला, तरी त्यात अनेक प्रकारचे धोकेही असतात. या धोक्यांपासूनच्या बचावाची माहिती असणं गरजेचं आहे. तुम्हाला तुमच्या मित्र किंवा नातेवाइकाकडून किंवा एखाद्या सोशल मीडियावर जोडल्या गेलेल्या व्यक्तीकडून एखाद्या मेसेजची लिंक येऊन ती लिंक आपण ओपन केल्यास आपला मोबाईल हॅक होऊन आपल्याकडील पूर्ण गुपित माहिती व आपले सोशल मीडिया अकाउंट ईमेल हॅक होऊन हॅकर त्याला पाहिजे तसा त्याचा वापर करून आपल्या नावाने मेसेज पाठवू शकतो उदा. 'मी अडचणीत आहे मला अमुक रुपयांची गरज आहे. पुढील नंबरवर ते पैसे तातडीनं पाठव प्लीज,' कधी कधी आपण ११००१ १०१० १०११-११०० ११०१ विचार न करता पैसे पाठवतो आणि आपण फसल्या जातो. सोशल



मीडियावरच्या 'हॅकर्स'कडून हा फसवणुकीचा प्रकार सध्या मोठ्या प्रमाणावर वापरला जात आहे. किनवट तालुक्यात सध्या एक योनो ची लोगो असलेली लिंक व्हाट्सअप ग्रुप वर येऊन ती लिंक ओपन केल्यास त्वरित वापरकर्त्याचा मोबाईल हॅक होऊन हॅकर सदरील सोशल मीडिया अकाउंट त्याला पाहिजे तसे वापरू शकतो.

हॅकर्स काय करू शकतात... अकाउंट हॅक करणे' म्हणजे एकाद्या अकाउंटवर अनधिकृतरीत्या ताबा मिळवणं. अकाउंट हॅक करणाऱ्या व्यक्तीला 'हॅकर' असं म्हणतात. आपल्या अकाउंटवर ताबा मिळवून पैसे किंवा माहिती चोरणं अशा हेतूंनी ते अकाउंट हॅक करतात. आपलं युजरनेम सोशल मीडियावर दिसतं, हॅकर्स पासवर्ड चोरून अकाउंटचा ताबा घेतात. त्यानंतर आपली सर्व व्यक्तिगत खासगी माहिती, आपली मित्रयादी इत्यादी माहिती हॅकर्स ला चोरता येते. याशिवाय त्यांना आपल्या नावानं आपल्या मित्र यादीतील मित्र- मैत्रिणींना मेसेजेस पाठवता येऊ शकतात आणि त्यातून त्यांची फसवणूक करता येते. व्हायरस किंवा अश्लील साहित्य पसरवण्यासाठी ते आपल्या अकाउंटचा वापर करू शकतात. यातून आपलं नाव विनाकारण खराब होण्यापासून मित्रांचं आर्थिक नुकसान होण्यापर्यंत काहीही घडू शकतं. कोणत्याही अनोळखी मित्र मैत्रिणीची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नका. आपल्याला आलेला ओटीपी कोणालाही शेअर करू नका. आपले सोशल मीडिया अकाउंट हॅक झाले असे आढळल्यास त्वरित सायबर सेल सी संपर्क करून आपली तक्रार नोंदवा सुनील बिर्ला पोलीस निरीक्षक किनवट

## जीवाची पर्वा न करता जनतेसाठी झगडणारा आपला माणूस म्हणजे शेखर सर

चिपळुण: जुलै २०२१ च्या प्रलयकारी पुरानंतर चिपळूण शहर व परिसरातील गावांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाल्याने नागरिक हताश झाले. परंतु ह्या प्रसंगांना व कठीण काळाला समोर डगमगून न जाता जनतेमध्ये मोठे धैर्य व आत्मविश्वास जागवला. शासनाची किंवा इतर संस्थेची मदत येण्यापूर्वीच पूरग्रस्तांना अन्नाचे पाकीट व पाण्याची व्यवस्था करून दिली . शहर व परिसरातील गावे पूर्व पदावर येण्याकरता रात्रंदिवस मेहनत घेतली. शासन सामाजिक संस्था यांच्याकडून जास्त जास्त मदत आणण्यासाठी प्रयत्न केले व यशस्वी ठरले.



फेब्रुवारी २०२१ रोजी तत्कालीन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली चिपळूण बचाव समिती व वरिष्ठ अधिकारी यांच्या समवेत गाळ काढण्याच्या महत्वपूर्ण विषयासंदर्भात मंत्रालयात सरांच्या पाठपुराव्यामुळे निर्णायक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. परंतु दुर्दैवाने आदल्या दिवशीच सरांना तातडीने उपचारासाठी मुंबईतील इस्पितळामध्ये ऍडमिट व्हावं लागले परंतु सरांना स्वतःवर होणाऱ्या उपचारापेक्षा दुसऱ्या दिवशी होणाऱ्या बैठकीचीच जास्त चिंता लागून राहिली होती सदर बैठकीमध्ये आपले शहर व परिसरातील गावे पुरमुक्त होण्यासाठी एक महत्त्वपूर्ण बैठक होणार होती. सदर बैठकीला आपण काही करून जीवाची पर्वा न करता उपस्थित राहायचं असं ठाम निर्णय सरांनी केला होता . दुसऱ्या दिवशी ठरलेल्या वेळेप्रमाणे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली चिपळूण बचाव समिती व वरिष्ठ अधिकारी यांची मंत्रालय बैठक सुरू झाली परंतु सदर बैठकीला सर न दिसल्यामुळे आपली बाजू मांडणार कोण ह्या चिंतेने बचाव समितीचे सदस्य ग्रासले होते. बैठक सुरू झाली व बरोबर पंधरा मिनिटांनी सर बैठकीचे ठिकाणी हजर झाले. परंतु त्यांचा अवतार बघून बैठकीमध्ये असलेले सर्वच जण अगदी अजितदादा पर्यंत सगळेच अवाक झाले कारण सरांच्या डाव्या हाताला सलाईन ची सुई बँडेज मध्ये अडकवलेली होती व त्याचा प्लास्टिक पाईप हा लोंबकळत होता तसेच उजव्या हाताला सुद्धा इंजेक्शन नंतर लावलेल्या असंख्य पट्ट्या होत्या. हा सर्व प्रकार बघून अजित दादा भावुक झाले व वडीलधारी भावनेतून सरांना ओरडून म्हणाले 'अरे शेखर का एवढी जोखीम घेतोस तू मी आहे ना इथे काळजी करू नकोस ! याला पुन्हा हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करा अशा सक्त सूचना पी एस यांना केल्या. परंतु सरांनी सदर बैठकीतून जाण्यास विनम्रपणे नकार दिला व संपूर्ण बैठक पूर्ण होईपर्यंत तिथेच थांबले.

याला म्हणतात नेता व नेतृत्व जो स्वतः च्या जीवापेक्षा नागरिकांच्या जनतेच्या समस्याला प्राधान्य देतो. दिखाव्याला नाही !

## भदंत ज्योतिरत्न महाथेरो यांना रिपब्लिकन सेनेच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली.

नवी मुंबई / के. एच. हनवते :- नालंदा सामाजिक शैक्षणिक केंद्राचे संस्थापक अध्यक्ष, अखिल भारतीय भिख्खू संघाचे अजिव सदस्य परमपूज्य. भदन्त ज्योतिरत्न महाथेरो यांच्या निर्वाणिक सुख:शांती करिता नालंदा विपश्यना केंद्र सेक्टर -६ ऐरोली नवी मुंबई येथे रविवार दिनांक : २२/०९/२०२४ रोजी रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष, सरसेनानी आनंदराज आंबेडकर साहेब यांनी उपस्थित राहून भावपूर्ण





श्रध्दांजली वाहिली त्यावेळी विरेंद्र लगाडे ( नवी मुंबई जिल्हाध्यक्ष,रिपब्लिकन सेना ), कैलाश सरकटे (प्रमुख संघटक रिपब्लिकन सेना,नवी मुंबई ), बौद्धाचार्य सुर्यकांत बोधी, बौध्दाचार्य : कल्याणराव हनवते, सौ. रेखाताई इंगळे नवी मुंबई महीला जिल्हाध्यक्ष, भारती कांबळे, रुक्मिणी पोटभरे, ऐश्वर्या मोहिते, सुशीला ढवळे, सना शेख, दीपा बम, संगीता चौधरी, पद्मिनीताई रणदिवे, प्रभावती हिंगोले, इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

## आगामी दोन-तीन दिवस पावसाचा जोर कायम



पुणे : प्रतिनिधी मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू झाला असून राज्याच्या विविध जिल्ह्यांत पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. आगामी दोन-तीन दिवस पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. पुणे शहर आणि परिसरात सोमवारी रात्रीपासून पावसाने दमदार हजेरी लावली आहे. यंदा परतीच्या पावसाला उशिरा सुरुवात झाली असून सध्या तो राजस्थान आणि गुजरातमध्ये असून नजीकच्या काळात त्याचा प्रवास पुढे सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र तसेच कोकण भागातील बहुतांशी जिल्ह्यांत पावसाने दमदार हजेरी लावली आहे तसेच आगामी तीन दिवस काही भागात मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवड आणि जिल्ह्याच्या काही भागात पावसाने दमदार हजेरी लावली असल्याने जनजीवन काही प्रमाणात विस्कळीत झाले असून सखल भागात पाणी साचले आहे. मात्र या पावसामुळे गेले काही दिवस जाणवत असणारा वातावरणातला उकाडा कमी होण्यास मदत झाली आहे.

# पितृ पक्षात कावळे झाले दुर्मिळ

### झपाट्याने घटतेय संख्या, पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली चिंता

:पितृपक्षात पूर्वजांचे स्मरण करावे
पितृपक्षात आपल्या दिवंगत पूर्वजांचे स्मरण करणे विहित असल्याने अन्य शुभ कार्ये वा उत्सव या काळात न करण्याचा संकेत हिंदू धर्मशाखात रूढ असल्याची माहिती माहूर येथील पंडित यांनी दिली. कुटुंब, आप्तेष्टांना भोजन देण्याची परंपरा आहे. पत्रावळीला विशेष महत्त्व आहे. भेंडी, भोपळा, दोडका, गवारीची भाजी, मुगवडा, भजे, खीर, कडी आदी पदार्थ या निमित्ताने बनवितात. पुर्वजांना स्मरून पुजा करून पत्रावळीत अन्न ठेवले जाते व हा नैवेद्यचा पहिला मान कावळ्यांना असतो. बुधवारी (दि. तीन आक्टोंबर) सर्व पितृ आमावस्याला या पितृपक्षाची समाप्ती होते.

किनवट/शेख शौकत सध्या पितृपक्ष पंधरवडा सुरु असून या निमित्ताने आपल्या दिवंगत पूर्वजांचे स्मरण केले जाते. पितृपक्षात आपल्या पितरांना जेऊ घालण्यासाठी हिंदू संस्कृतीत परंपरा आहे. त्यामुळे पितृ पक्षातील हे १५ दिवस महत्वाचे मानले जातात. या निमित्ताने आपल्या दिवंगत पूर्वजांच्या आत्म्याच्या शांती आणि तृप्तीसाठी श्राद्ध, पिंडदान, तर्पण असे विधी करून त्यांचे स्मरण केले जाते. या सगळ्यात कावळा असणेही तितकेच महत्वाचे असते. मात्र, सध्याची परिस्थिती लक्षात घेता कावळे दुर्मिळ झाल्याचे चित्र आहे. शहरातून तर कावळे हद्दपार झाले आहेत आता ग्रामिण भागातही जवळपास अशीच परिस्थिती आहे. कावळ्यांची झालेली दुर्मिळ संख्या ही पितृपक्षात सर्वांसाठी चिंतेचा विषय झाला आहे.



वर्षांतून दोन वेळा पितरांसाठी पूजा, पिंडदान केले जाते. एक उन्हाळी पित्र व दुसरे पावसाळी पित्र अशी ग्रामीण भागात केली जातात. उन्हाळ्यामध्ये अक्षय तृतीयाला पितरांचे पूजन तसेच घास कावळ्यांना दिला जातो तर गणपती विसर्जनानंतर लगेचच पितृपंधरवाडा सुरू होतो. भाद्रपद महिन्यातील कृष्णपक्ष हा पितृपक्ष म्हणून ओळखला जातो. आपल्या पुर्वजांच्या नावे श्राध्द करून पितंर जेवायला घातले म्हणजे त्यांच्या आत्म्याला शांती मिळते, हा या मागील उद्देश आहे. दुपारच्या वेळी आपल्या पूर्वजांच्या नावाने कावळ्यांना घास स्वार मालपानी पना आहे पपा पहिल्यासारखे आता कावळे फारसे दिसत नाहीत. कावळ्यांनी घास खावा, अशी अनेकांची श्रद्धा असते. मात्र, सध्याच्या काळात कावळाच दृष्टीत पडत नसल्याने अडचण झाली आहे. नेहमी कावल्याची आवण पितफक्षात येत असते पितृपक्षात पितरांसाठी प्रत्येकांना कावळा हवा असतो, मात्र तो दृष्टीस पडत नाही.

तसेच अनेकांच्या संशोधनातून असे सांगण्यात येते की, मोबाईलचा जास्त वापर झाल्याने आणि मोबाईल टॉवरमुळे देखील चिमण्या, कावळ्यांची संख्या घटत असल्याचे सांगितले जाते. पंचागानुसार पितृ पक्ष भाद्रपद महिन्याच्या पोर्णिमपासून ते अमावास्येपर्यंत असतो. यंदा दि. १७ सप्टेंबर ते दि. २ ऑक्टोबर दरम्यान पितृपक्ष आहे. या कालावधीत केले जाणारे पिंडदान हे सर्वात श्रेष्ठ दान असून स्वर्गात असलेल्या पूर्वजापर्यंत पोहोचते. हे पिंड दान मध्यान्हेला दुपारी करणे योग्य मानले जाते. या श्राद्धविधीत आपल्या गोत्रातील ज्ञात अज्ञात अशा सर्वांचे पिंडरूपाने पूजन केले जाते. या पक्षात यमलोकातून पितर (आपले मृत पूर्वज) आपल्या कुटुंबीयांच्या घरी वास्तव्य करण्यासाठी येतात, अशी समजूत असल्याने, हा पक्ष पंधरवडा अशा पितृकार्याला योग्य समजला जातो. भाद्रपद पौर्णिमेपासून अमावास्येपर्यंत रोज महालय श्राद्ध करावे असे आवतजन आहे.

# आद. भदंत ज्योतिरत्न महाथेरो अनंतात विलीन..!

ठाणे लोकसभा खासदार : नरेश म्हस्के, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भारत सरकार कॅबिनेट मंत्री : रामदास आठवले, ( दि. बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया ) कार्याध्यक्ष : भिमराव यशवंत आंबेडकर, रिपब्लिकन सेना (सरसेनानी) आनंदराज आंबेडकर, (आरपीआय) : राजरत्न आंबेडकर इत्यादी विविध मान्यवरांकडून भावपूर्ण आदरांजली..! हजारोंच्या संख्येत उपस्थित जनसमुदायांनी आद. : भदंत ज्योतिरत्न महाथेरो यांना वाहीली भावपूर्ण श्रध्दांजली.

नवी मुंबई / के. एच. हनवते :- दिनांक - २२/९/२०२४ रोजी ऐरोली (नवी मुंबई) येथील स्मशानभूमीत जागतिक कीर्तीचे विपश्यनाचार्य - नालंदा सामाजिक शैक्षणिक, विपश्यना केंद्राचे संस्थापक अध्यक्ष व बौद्ध धम्म प्रसारक आद. भदंत ज्योतीरत्न महाथेरो यांचे शुक्रवार दि.६ सप्टेंबर २०२४ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांचे पार्थिव रविवार दि. २२ सप्टेंबर २०२४ पर्यंत अंतिम दर्शनासाठी नालंदा विपश्यना केंद्र ऐरोली, सेक्टर ६, नवी मुंबई. येथे ठेवण्यात आले होते. त्यानुसार रविवार दि.२२ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १० वा. नालंदा विपश्यना केंद्र, सेक्टर ६, ऐरोली, नवी मुंबई येथे महती अट्ठपरिक्कार व महासंघदान कार्यक्रम आयोजित






करण्यात आले. तसेच आद. भदंत ज्योतीरत्न महाथेरो यांच्या भव्य अंतिम यात्रेची सुरुवात रविवार दि. २२ सप्टेंबर २०२४ रोजी सायं. ४ वा. नालंदा विपश्यना केंद्र सेक्टर ६ ऐरोली नवी मुंबई येथून सुरू करण्यात आले. अंतिम अग्नीसंस्कार दिवागाव स्मशानभूमी, सेक्टर ९, ऐरोली येथे करण्यात आले. सदर कार्यक्रमास देश विदेशातील पूज्य भदंत थेरो, दि ग्रेट हॅपिनेस यू ट्यूब चॅनल चे भिक्खू करूणानंद थेरो, भिक्खू - भिक्खुणी संघाची उपस्थिती होती. तरी समस्त भिक्खु संघ, बौद्ध उपासक- उपासिका यांनी अंतिम दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित दाखविली. ठाणे लोकसभा खासदार : नरेश म्हस्के सह स्थानिक शिवसेना नेते तथा जिल्हाप्रमुख नवी मुंबई: विजय चौगुले यांनी सुध्दा आपली उपस्थिती दर्शविली. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री: देवेंद्र फडणवीस, राहुल नार्वेकर आदी मान्यवरांनी सुद्धा सदर अंत्ययात्रेस आपली उपस्थिती दाखवून अंत्यदर्शन घेतले. तत्पूर्वी आरपीआय चे रामदास आठवले सह नवी मुंबई जिल्हाध्यक्ष महेश खरे, (आरपीआय) मा. जिल्हाध्यक्ष सिद्राम वोव्हाळ, (दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया) कार्याध्यक्ष : भिमराव यशवंत आंबेडकर, (रिपब्लिकन सेना) आनंदराज आंबेडकर आणि वंचित बहुजन अघाडीचे शेकडो कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते तसेच भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई पदाधीकारी व बौध्दाचार्य तसेच समता सैनिक दल यांनी उपस्थित राहून आदरणीय भदंत ज्योतिरत्न महाथेरो यांना मानाची सलामी दिली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE